**अधिसूचना**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २४/०६/२०१४.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८

क्रमांक:एमएसए-०६/२०१४/प्र.क्र.१७४/कामगार-१०, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई एकोणऐंशी) (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) च्या कलम ६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व कामगार आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या क्रमांक दुकाने/मुंदवआ/निलंबन/२०१४/कार्यासन-१३,दि.२८/११/२०१३च्या अधिसूचनेतील मुद्दा क्र.८ अधिक्रमित करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे, उक्त अधिनियमाच्या कलम १०(१), ११(१)(अ), १६, १८, १९(१) व २३ खालील तरतुदी राज्यात रमजान या सणाच्या कालावधीत दि.२९/०६/२०१४ ते दि.२९/०७/२०१४ या कालावधीकरीता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून स्थगित करीत आहे :-

१. उक्त अधिनियमातील कलम १०(१), ११(१)(अ), १६, १८, १९(१) व २३ या कलमांखालील तरतुदी या दि.२९/०६/२०१४ ते दि. २९/०७/२०१४ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीसाठी स्थगित राहतील.
२. कोणत्याही कामगारास उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये विहित केलेल्या कामाच्या तासापेक्षा अधिक वेळ काम करणे भाग पडल्यास,
   (अ) त्याची विहित नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात यावी, आणि
   (ब) अतिकालिक कामाबद्दलचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी नसावा.
३. दुकाने, रेस्टॉरंट, खाद्यगृहे आणि निवासी हॉटेल्समधील कामाचे तास कोणत्याही दिवशी १४ तासापेक्षा अधिक असणार नाहीत.
४. विहित साप्ताहिक सुट्ट्यांचा लाभ न मिळाल्यास,
   (अ) प्रत्येक कामगारास त्याबदल्यात वर नमुद स्थगित कालावधी संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत तेवढयाच बदली रजा देण्यात येतील, आणि
   (ब) प्रत्येक कामगारास उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये विहित केलेल्या दरापेक्षा कमी नसेल अशा दराने सुट्टयांच्या दिवशी केलेल्या कामाबद्दल अतिकालिक वेतन देण्यात येईल.
५. दुकाने, रेस्टॉरंट, खाद्यगृहे आणि निवासी हॉटेल यांना दिवसातील कोणतेही १४ तास त्यांची आस्थापना उघडी ठेवण्याचे स्वातंत्र्य असेल.
६. कोणत्याही महिला कामगारास रात्री ९.३० वा.नंतर काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही.
७. उक्त अधिनियमाच्या कलम २(३३) मध्ये विहित केलेल्या कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीस सायंकाळी ७.०० वा.नंतर काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही.
८. प्रत्येक कामगारास सलग ५ तास काम केल्यानंतर १ तासाची विश्रांती देण्यात येईल.
९. वरील अटी व शर्तींव्यतिरिक्त अधिनियमातील इतर तरतुदी यथास्थिती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.म.बाविस्कर)
कार्यासन अधिकारी

F:\SIDDHI\SSE\notification\SSE_2014\notification_festiva_ramjan_marathi_2014.doc

महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र भाग-१ एल मध्ये दिनांक १४ /०६/२०१४ मध्ये मुद्रित करण्यासाठी रवाना या अधिसूचनेच्या २० प्रती शासनास सादर कराव्यात व त्याच्या २० प्रती कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर अधिसूचना व त्याचे इंग्रजी भाषांतर शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी सहसचिव (कामगार) यांनी मान्यता दिलेली आहे.

(अ.म.बाविस्कर)
कार्यासन अधिकारी

प्रत माहितीसाठी :-

१) कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई-५१.
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,महानगरपालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.
३) निवडनस्ती (कामगार-१०)

F:\SIDDHI\BSE\notification\BSE_2014\notification_festiva_manjari_marathi_2014.doc